# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २१.०७.२०२६ मंगळवार**

**१) मा. न्यायालयातुन आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक २१.०७.२०२६ रोजी मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपुर, श्री. पि. जे. मोडक साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे विशेष पोक्सो केस क्र. २५४/२०१९ मधील, पोलीस ठाणे सिताबर्डी येथील अप. क्र. ४७२/२०१९ कलम ३५४(क) भा.दं.वि., सहकलम १२ पोक्सो, सहकलम ६७(ब),६६(ई) माहीती तंत्रज्ञान कायदा या गुन्ह्यातील आरोपी निखील उर्फ पिंटु दिपक चौथमल, वय २७ वर्षे, रा. प्लॉट नं. ९९४, शितला माता मंदीर जवळ, आंबेडकर नगर, पाचपावली, नागपूर याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ३५४(क) भा.दं.वि., १२ पोक्सो, ६६(ई) माहीती तंत्रज्ञान कायदामध्ये, ०३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व एकुण ४,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक १०.०८.२०१९ चे १९.४५ वा चे सुमारास, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत सिताबर्डी मार्केट परीसरातील फ्रेन्ड्स दुकानाचे दुसऱ्या माळ्यावर १७ वर्षीय अल्पवयीन फिर्यादी ही तीचे मैत्रीनीसोबत युनिफॉर्म घेण्यास गेली होती. ट्रायल रूममध्ये गेली असता, यातील आरोपी याने त्याचे मोबाईल ने फिर्यादी पिडीतीचे आक्षेपार्ह चित्रीकरण करून, फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याने तीचा विनयभंग केला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक १०.०८.२०१९ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी मसपोनि. श्रीमती शुभदा संखे मॅडम यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती आसावरी परसोडकर मॅडम यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. वाय. बि. मंडपे साहेब यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. किरण कैथल व मिनल लोणारे यांनी काम पाहिले.

**२) नागपुर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत, गुन्हेगारांचे आदान—प्रदान संपन्न :—**

मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील, यांचे संकल्पनेतुन आरोपींचे आदान—प्रदान उपक्रम कार्यक्रम दिनांक २१.०७.२०२६ चे १५.०० वा. अलंकार सभागृह, पोलीस मुख्यालय, नागपूर येथे मा. पोलीस आयुक्त यांचे प्रमुख उपस्थीतीत पार पडला. नागपुर शहरातील संपुर्ण पोलीस ठाणे तसेच, गुन्हेशाखा येथे अटक असणारे एकूण २७ आरोपींचे आदान—प्रदान पार पडले. कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, व आरोपींची गुन्हे करण्याची पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत याबाबत माहितीचे आदान—प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. पोलीस उपआयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल व मा. सहायक पोलीस

आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. वैभव जाधव तसेच, आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील अधिकारी व अंमलदार आरोपींसह हजर होते.

कार्यक्रम प्रसंगी मा. पोलीस आयुक्त यांनी हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचा डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा हजर ठाणे प्रभारी व तपासी अधिकारी तसेच अंमलदार यांना सुचना दिल्या.

**(कामगिरी)**

**<u>गणेशपेठ पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास शस्त्रासह अटक.</u>**

दिनांक २०.०७.२०२६ चे १४.०० वा. चे सुमारास, गणेशपेठ पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, लोधीपुरा, जुना जेलखाना झेंडा जवळ राहणारा एक हद्यपार इसम त्याचे घरी आलेला आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी जावुन तेथे राहणारा हद्दपार ईसमास चेक केले असता, तो राहते घरी मिळुन आला. त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शेख अजहर शेख मजहर, वय २८ वर्षे असे सांगीतले. पंचासमक्ष त्याचे घराची झडती घेतली असता, पलंगाचे गादीखाली एक लोखंडी धारदार चाकु किंमती २००/—रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपीला पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०३ यांचे हद्दपार आदेश क्र. ०६/२०२६, दिनांक ११.०२.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत घातक शस्त्रासह दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने त्याचे राहते घरी समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे गणेशपेठ येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो. का., सहकलम ४, २५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे.

वरील कामगिरी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अतुल तवाडे यांचे मार्गदर्शनाखाली सफौ. समीर शेख, पोअं. पवन, प्रतीक व अनुप यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे बजाजनगर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २१.०७.२०२६ चे ०६.४५ वा. चे सुमारास, फिर्यादी सुनिल खुशालराव गुडधे, वय ६२ वर्षे, रा. प्लॉट नं. ३६८, गांधीनगर, मेट्रो स्टेशन जवळ, नागपुर हे त्यांचे मित्र नामे शैलेंद्र मारोतराव किनगांवकर, वय ६२ वर्षे, रा. प्लॉट नं. २३ बि, कार्पोरेशन कॉलोनी, नागपुर व सुनिल आनंदराव जाधव, वय ६५ वर्षे, रा. कार्पोरेशन कॉलोनी नाल्याचे काठावर, नागपुर असे तिघे मॉर्निंगवॉक करीत पोलीस ठाणे बजाजनगर हद्दीत, रामनगर चौकातुन गांधी नगर (एलएडी चौक) सिग्नल जवळ आले. तेथे थोडे थांबले असता, शंकर नगर कडुन येणाऱ्या एस.टी.महामंडळाची बस क्र. एम.एच. ४० वाय ५१२७ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन चारचाकी दुधाचा टाटा इन्ट्रा टेम्पो क्र. एम.एच. ३१ जि.बी. ०५८५ या गाडीला धडक मारली. फिर्यादी व त्यांचे मित्र असे तिघे रोडचे कडेला असल्याने तिघांचे अंगावर टेम्पो पडल्याने सुनिल जाधव यांचे दोन्हीही पाय टेम्पोखाली दबले. फिर्यादी व शैलेंद्र यांना सुध्दा मार लागुन तिघेही गंभीर जखमी झाले. लोकांनी सर्वांना उपचाराकरीता वोक्हार्ट हॉस्पीटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान डॉक्टरांनी सुनिल जाधव यांना तपासुन मृत घोषीत केले. फिर्यादी व शैलेंद्र यांचा उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे मसपोनि. गिन्हे यांनी बस चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१,१२५(अ) भा.न्या.सं., सहकलम १७७,१८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे अजनी</u> :—** सौ. निकिता सुनिल उईके, वय २६ वर्षे, रा. रत्नाळा, तह.जि. गोंदीया ह्या दिनांक ०६.०७.२०२६ चे ११.०० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीत कामावरील ठिकाणी कुणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाहीत. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची— ५ फुट १ इंच, केस— काळे व लांब, अंगात— लाल—पांढऱ्या रंगाची कुर्ती घातलेली आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे सक्करदरा</u> :—** सौ. विमलबाई पुरणलाल कहार, वय ७० वर्षे, रा. चिचली, नरसिंगपुर, म.प्र. ह्या दिनांक ११.०७.२०२६ चे २३.०० वा. पासुन पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत मोठा ताजबाग दर्गाह परीसर येथुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाहीत. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची— ५ फुट १ इंच, केस— पांढरे व लांब, अंगात— हिरव्या रंगाची साडी व पांढऱ्या रंगाचे ब्लाऊज घातलेले आहे. भाषा— हिंदी बोलतात.

**<u>३) पोलीस ठाणे अजनी</u> :—** कु. अपुर्वा ओमप्रकाश वासनिक, वय १८ वर्षे, रा. प्लॉट नं. ८३, बालाजी नगर, अजनी, नागपुर ही दिनांक १६.०७.२०२६ चे ०९.३० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीतील राहते घरून कुणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची— ५ फुट १ इंच, केस— काळे व लांब, अंगात— लाल—काळ्या रंगाची टि—शर्ट व काळ्या रंगाचा पायजामा घातलेले आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलते.

**<u>४) पोलीस ठाणे सक्करदरा</u> :—** सौ. साक्षी शुभम मेश्राम, वय २५ वर्षे, रा. प्लॉट नं. ३१, भेंडे ले—आऊट, खामला, नागपुर ह्या दिनांक १२.०७.२०२६ चे १६.३० वा. पासुन पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत कमला नेहरू कॉलेज गेट येथुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाहीत. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे व लांब, अंगात— स्कीन रंगाचा टॉप व काळ्या रंगाचा बॅगी जिन्स पॅन्ट घातलेले आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— डाव्या हातावर मम्मी पप्पा असे गोंदलेले आहेत.

**<u>५) पोलीस ठाणे कोराडी</u> :—** कृष्णा अनिल पसवान, वय १७ वर्षे, रा. पंप हाऊस, लोणारा, कोराडी, नागपुर हा दिनांक १८.०७.२०२६ चे ०६.०० वा. पासुन पोलीस ठाणे कोराडी हद्दीतील राहते घरून फिरायला जातो असे सांगुन कुठेतरी निघुन गेला. घरी परत आला नाही. शोध घेतला असता मिळून आला नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची— ६ फुट, केस— काळे, अंगात— पांढऱ्या रंगाचा फुल बाहीचा शर्ट व काळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेले असुन सोबत निळ्या रंगाची लहान बॅग आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलते.


सौ. निकिता


सौ. विमलबाई


कु. अपुर्वा


सौ. साक्षी


कृष्णा

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १७ वे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०४०१९५ /१९९८ | कलम ४४८, ४२६,५०४, ५०६ भा.दं. वि. | १) किशोर आकशरे, वय ३९ वर्षे, रा. प्रियदर्शीनी कॉलेज, प्लॉट नं. ११, आर.टी.ओ. कार्यालय जवळ, सिताबर्डी, नागपुर.<br>२) दिगांबर लक्ष्मणराव नारनवरे, वय २६ वर्षे, रा. गोपाळ नगर, दुसरा बस स्टॉप, सनजोड चे घराजवळ, प्रतापनगर, नागपुर. | २४.०७.२०२६ |
| २. | मा. १७ वे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०२६३४/ २०११ | कलम ३७९, ३४ भा.दं.वि. | दिनेश रमेश तानवे, रा. महाराज बागरोड फुटपाथवर, नत्थु हॉटेल जवळ, नागपुर, सिताबर्डी, नागपुर | २४.०७.२०२६ |
| ३. | मा. जिल्हा न्यायाधिश —२० तथा अती सत्र न्यायाधिश, नागपुर. | ५३८/२०१ ६ | कलम ३०७, ३४ भा.दं.वि. | रोशनी गंगाधर बुर्रेवार, रा. भावना बिल्डींग, शिवमंदीर जवळ, खलाशी लाईन, सदर, नागपुर. | २२.०७.२०२६ |

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**